# साईं बाबा काकड आरती

## 1. भूपाळी (संत तुकाराम इस आरती के रचनाकार )

जोडूनियां कर चरणीं ठेविला माथा । परिसावी विनंती माझी सदुरुनाथा ।। 1 ।।
असो नसो भाव आलों तूझिया ठाया । कृपादृष्टीं पाहें मजकडे सदुरुया ।। 2 ।।
अखंडित असावें ऐसें वाटतें पायी । सांडूनी संकोच ठाव थोडासा देईं ।। 3 ।।
तुका म्हणे देवा माझी वेडीवांकुडी । नामें भवपाश हातीं आपुल्या तोड़ी ।। 4 ।।

## 2. भूपाळी

उठा पांडुरंगा आतां प्रभातसमयो पातला । वैष्णवांचा मेळा गरुडपारीं दाटला ।। 1 ।।
गरुडपारापासुनी महाद्धारापर्यंत । सुरवरांची मांदी उभी जोडूनियां हात ।। 2 ।।
शुकसनकादिक नारद-तुबंर भक्तांच्या कोटी । त्रिशूल डमरु घेउनि उभा गिरिजेचा पती ।। 3 ।।
कलीयुगींचा बक्त नामा उभा कीर्तनीं । पाठीमागें उभी डोळा लावुनियां जनी ।। 4 ।।

## 3. भूपाळी

उठा उठा श्री साईनाथ गुरु चरणकमल दावा । आधिव्याधि भवताप वारुनी तारा जडजीवा ।। ध्रु0 ।।
गेली तुम्हां सोडुनियां भवतमरजनी विलया । परि ही अज्ञानासी तुमची भलवि योगमाया ।
शक्ति न आम्हां यत्किंचितही तिजला साराया । तुम्हीच तीतें सारुनि दावा मुख जन ताराया ।। चा0 ।।
भो साइनाथ महाराज भवतिमिरनाशक रवी । अज्ञानी आम्ही किती तव वर्णावी थोरवी ।
ती वर्णितां भागले बहुवदनि शेष विधि कवी ।। चा0 ।।
सकृप होउनि महिमा तुमचा तुम्हीच वदवावा ।। आधि0 ।। उठा0 ।। 1 ।।

eAstroHelp

बक्त मनीं सद्भाव धरुनि जे तुम्हां अनुसरले । ध्यायास्तव ते दर्शन तुमचें द्वारि उभे ठेले ।
ध्यानस्था तुम्हांस पाहुनी मन अमुचें धालें । परि त्वद्वचनामृत प्राशायातें आतुर झालें ।। चा ।।
उघडूनी नेत्रकमला दीनबंधु रमाकांता । पाहिं बा कृपादृष्टीं बालका जशी माता ।
रंजवी मधुरवाणी हरीं ताप साइनाथा ।। चा0 ।।
आम्हीच अपुले काजास्तव तुज कष्टवितों देवा । सहन करिशिल तें ऐकुनि घावी भेट कृष्ण धांवा ।। उठा उठा0 ।। आधिव्याधि0 ।। 2 ।।

## 4. भूपाळी

उठा पांडुरंगा आतां दर्शन घा सकळां । झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा ।। 1 ।।
संत साधू मुनी अवघे झालेती गोळा । सोडा शेजे सुख आतां बंघु घा मुखकमळा ।। 2 ।।
रंगमंडपी महाद्वारीं झालीसे दाटी । मन उतावीळ रुप पहावया दृष्टी ।। 3 ।।
राही रखुमाबाई तुम्हां येऊं घा दया । शेजे हालवुनी जागें करा देवराया ।। 4 ।।
गरुड हनुमंत उभे पाहती वाट । स्वर्गीचे सुरवर घेउनि आले बोभाट ।। 5 ।।
झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा । विष्णुदास नामा उभा घेऊनि कांकाड़ा ।। 6 ।।

## 5. अभंग

घेउनियां पंचारती । करुं बाबांसी आरती ।। करुं साई सी0 ।। 1 ।।
उठा उठा हो बांधव । ओंवाळूं हा रमाधव ।। सांई र0 ।। ओं 0 ।। 2 ।।
करुनीयां स्थीर मन । पाहूं गंभीर हें ध्यान ।। साईंचें हें0 ।। पा0 ।। 3 ।।
कृष्णनाथा दत्तसाई । जडो चित्त तुझे पायीं ।। साई तु0 ।। जडो0 ।। 4 ।।

## 6. कांकंड आरती

eAstroHelp

कांकडआरती करीतों साईनाथ देवा । चिनमयरुप दाखवीं घेउनि बालक-लघुसेवा ।। ध्रु0 ।।
काम क्रोध मद मत्सर आटुनी कांकडा केला । वैराग्याचे तूप घालुनी मी तो भिजवीला ।
साईनाथगुरुभक्तिज्वलनें तो मी पेटविला । तद्वृत्ती जाळुनी गुरुनें प्रकाश पाडिला ।
द्वेत-तमा नासूनी मिळवी तत्स्वरुपीं जीवा ।। चि0 ।। 1 ।।
भू-खेचर व्यापूनी अवघे हृत्कमलीं राहरसी । तोचि दत्तदेव तू शिरड़ी राहुनी पावसी ।
राहुनि येथे अन्यत्रहि तू भक्तांस्तव धांवसी । निरसुनियां संकटा दासा अनुभव दाविसी ।
न कळे त्वल्लीलाही कोण्या देवा वा मानवा ।। चि0 ।। 2 ।।
त्वघशदुंदुभीनें सारें अंबर हेंकोंदलें । सगुण मूर्ति पाहण्या आतुर जन शिरडी आले ।

## 7. कांकंड आरती ( पंढरीनाथा )

भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योती । पंचप्राण जीवें भावें ओवाळूं आरती ।। 1 ।।
ओंवाळूं आरती माइया पंढरीनाथा माझ्या साईनाथा । दोन्ही कर जोडोनी चरणीं ठेविला माथा ।। ध्रु0 ।।
काय महिमा वर्णूं आतां सांगणे किती । कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ।। 2 ।।
राही रखुमाबाई उभ्या दोघी दो बाहीं । मयूरपिच्छ चामरें ढाळिति ठायींचे ठायीं ।। 3 ।।
तुका म्हणे दीप घेउनि उन्मनीत शोभा । विठेवरी उभा दिसे लावण्यगाभा ।। 4 ।। ओवाळूं 0 ।।

## 8. पद (उठा उठा)

उठा साधुसंत साधा आपुलालें हित । जाईल जाईल हा नरदेह मग कैंचा भगवंत ।। 1 ।।
उठोनियां पहांटे बाबा उभा असे विटे । चरण तयांचे गोमटे अमृतदृष्टि अवलोका ।। 2 ।।
उठा उठा हो वेगेंसीं चला जाऊंया राइळासी । जळतिल पातकांच्या राशी कांकंडआरती देखिलिया ।। 3 ।।
जागें करा रुक्मिणीवर, देव आहे निजसुरांत । वेंगें लिंबलोण करा दृष्ट होईल तयासी ।। 4 ।।
दारीं वाजंत्रीं वाजती ढोल दमामे गर्जती । होते कांकडआरती माइया सदगरुरायांची ।। 5 ।।
सिंहनाद शंखभेरी आनंद होतो महाद्धारी । केशवराज विटेवरी नामा चरण वंदितो ।। 6 ।।

eAstroHelp

भजन

साईनाथगुरु माझे आई । मजला ठाव घावा पायीं ।।
दत्तराज गुरु माझे आई । मजला ठाव घावा पायीं ।।
श्री सच्चिदानंद सदगुरु साईनाथ महाराज क जय ।।

## 9.श्री सांईनाथ प्रभाताष्टक

प्रभातसमयीं नभा शुभ रवि प्रभा फांकली । स्मरे गुरु सदा अशा समयिं त्या छळे ना कली ।।
म्हणोनि कर जोडूनी करुं अतां गुरुप्रार्थना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 1 ।।
तमा निरसि भानु हा गुरुहि नासि अज्ञानता । परन्तु गुरुची करी न रविही कधीं साम्यता ।।
पुन्हां तिमिर जन्म घे गुरुकृपेनि अज्ञान ना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 2 ।।
रवि प्रगट होउनि त्वरित घालवी आलसा । तसा गुरुहि सोडवी सकल दुष्कृतीलालसा ।।
हरोनि अभिमानही जडवि तत्पदीं भावना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 3 ।।
गुरुसि उपमा दिसे विधिहरीहरांची उणी । कुठोनि मग येई ती कवनिं या उगी पाहुणी ।।
तुझीच उपमा तुला बरवि शोभते सज्जना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 4 ।।
समाधि उतरोनियां गुरु चला मशीदीकडे । त्वदीय वचनोक्ति ती मधुर वारिती सांकडें ।।
अजातरिपु सदगुरु अखिलपातका भंजना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 5 ।।
अहा सुसमयासि या गुरु उठोनियां बैसले । वोलोकुनि पदाश्रिता तदिय आपदे नासिलें ।।
असा सुहितकारि या जगतिं कोणिही अन्य ना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 6 ।।
असे बहुत शाहणा परि न ज्या गुरुची कृपा । न तत्स्वहित त्या कळे करितसे रिकाम्या गपा ।।
जरी गुरुपदा धरी सुदृढ़ भक्तिने तो मना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 7 ।।
गुरो विनति मी करीं हृदयमंदिरीं या बसा । समस्त जग हें गुरुस्वरुपची ठसो मानसा ।।
घडो सतत सत्कृती मतिहि दे जगत्पावना । समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ।। 8 ।।

eAstroHelp

स्रग्धरा

प्रेमें या अष्टकासी पढुनि गुरुवरा प्रार्थिती जे प्रभातीं । त्यांचे चित्तासि देतों अखिल हरुनियां भ्रांति मी नित्य शांती ।।
ऐसें हें साईनाथें कथुनि सुचविलें जेविं या बालकासी । तेवीं त्या कृष्णपायीं नमुनि सविनयें अर्पितों अष्टकासी ।। 1 ।।
श्री सच्चिदानंद सदगुरु साईनाथ महाराज की जय ।।

## 10. पद

सांई रहम नजर करना, बच्चों का पालन करना ।। धु0 ।।
जाना तुमने जगत्पसारा, सबही झूठ जमाना ।। साई0 ।। 1 ।।
मैं अंधा हूँ बंदा आपका, मुझको प्रभु दिखलाना ।। साई0 ।। 2 ।।
दास गनू कहे अब क्या बोलूं, थक गई मेरी रसना ।। साई0 ।। 3 ।।

## 11. पद

रहम नजर करो, अब मोरे साई, तुम बिन नहीं मुझे माँ बाप भाई ।। धु0 ।।
मैं अंधा हूँ बंदा तुम्हारा ।। मैं ना जानूं अल्लाइलाही ।। 1 ।।
खाली जमाना मैंने गमाया, साथी आखिर का किया न कोई ।। 2 ।।
अपने मस्जिद का झाड़ू गनू है । मालिक हमारे, तुम बाबा साई ।। 3 ।।

## 12. पद

तुज काय देऊं सावळ्या मी खाया तरी, मी दुबली बटिक नाम्याची जाण श्रीहरी ।
उच्छिष्ट तुला देणें ही गोष्ट ना बरी, तूं जगन्नाथ, तुज देऊँ कशी रे भाकरी ।
नको अंत मदीय पाहूं सख्या भगवंता । श्रीकांता ।
माध्यान्हरात्र उलटोनि गेली ही आतां । आण चित्ता ।
जा होईल तुझा रे कांकडा ही राउळांतरीं । आणतील भक्त नैवेद्य हीनानापरी ।।

eAstroHelp

**13. पद**

**4. श्री सदगुरु बाबासाई तुजवांचुनि आश्रय नाही, भूतली ।। धु० ।।**
**मी पापी पतित धीमंदा । तारणें मला गुरुनाथा, झडकरी ।। 1 ।।**
**तूं शांतिक्षमेचा मेरु । तूं भवार्णवींचें तारुं, गुरुवरा ।। 2 ।।**
**गुरुवरा मजसि पामरा, अता उद्धरा, त्वरित लवलाही, त्वरित लवलाही,**
**मी बुडतों भवभय डोही उद्धरा ।। श्री सदगु० ।। 3 ।।**

eAstroHelp